अव्वल मुकदम्यात हुकूमनामा
ऑ. २० कानु. ६, ७, फॉर्म नं. १
**पुरवणी ह, परिशिष्ट १**

अ

दिवाणी अ ३७ म

# हुकूमनामा

## देवगड येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

रे.दि.मु.नं. २३/२०२६
नि.ता. १४/०३/२०२६
निशाणी क्रमांक -१०

**श्री. संजय विठ्ठल लांबोरे**
उ.व.सु, ३९, धंदा-शेती व नोकरी
रा. पाटगाव, ता. देवगड जि. सिंधुदुर्ग
} **वादी**

**विरूध्द**

**१. परशुराम भगवान लांबोरे**
उ.व.सु. ६४, धंदा - शेती

**२. शांताराम भगवान लांबोरे**
उ.व.सु. ४४, धंदा - शेती
**अ.क्र. १ व २**
रा. गोवळ सोमलेवाडी,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग,
महाराष्ट्र ४१६८११

**३. भाऊ भगवान लांबोरे**
उ.व.सु.४८, धंदा - नोकरी
रा. ८६६/३, किंगकॉग नगर,
घोडबंदर राडे विजय नगरी ऍनेक्स मागे,
डोंगरीपाडा, ठाणे वेस्ट मुंबई महाराष्ट्र ४००६०६

**४. तुकाराम भगवान लांबोरे**
उ.व.सु, ५१, धंदा- शेती
रा. रूम नं. ११, चाळ नं. ४,साई राज सोसायटी,
दीवा अगासन रोड आमे कार नगर
दिवा ईस्ट, मुंब्रा ठाणे महाराष्ट्र ४००६१२
} **प्रतिवादी**

**दावा ठरावाकरीता**

**दावा आकरणी र. रू १०००/-**

**मी सदरहू वादी नम्रतापूर्वक कळवितो ते येणेप्रमाणे -**

**१.** जिल्हा व रजिष्ट्रार तुकडी सिंधुदुर्ग पैकी तालुका व सबरजिष्ट्रार पोटतुकडी देवगड या हद्दीतील गाव मौजे सोमलेवाडी येथील स्थावर मिळकतीचा तपशील -

| अ.क्र. | भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र | आकार | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | ८/१३ | ०.०६.००<br>०.३७.००<br>०.४३.०० | ०.०२ | काजरवरणेची धार |
| २. | ५१/३७ | ०.०१.०० | ०.०२ | पळस काटे |

वरील दावा मिळकत क्र. १ मधील संपूर्ण क्षेत्रापैकी खाते क्र. ५२४ यातील प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावासमोर असलेले क्षेत्र ०.०१.०० व पो. ख. ०.०६.१८ एकूण क्षेत्र ०.०७. १८ एवढे क्षेत्र व दावा मिळकत क्र. २ मधील ०.०१.०० एवढे क्षेत्र हा दाव्याचा विषय आहे.

येणेप्रमाणे मिळकत त्यातील जमिन जुमला, झाडझाडोरा, जल, तरू, तृण, काष्ठ, पाषाण, निधी निक्षेप, पाटपाणी, पोटखराबा तदंगभूत काही एक वगळ न करताची मिळकत ही दाव्याचा विषय आहे.

**२.** प्रतिवादी क्र. १ ते ४ हे सख्खे भाउ असून वादी हे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे चुलत भाउ आहेत.

**३.** वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची स्वकष्टार्जीत मालकी वहिवाटीची मिळकती होती व आहे. सदर दावा क्र. १ ची विषय असलेल्या एकूण क्षेत्रापैकी ०.०७.१८ एवढया क्षेत्रात वादी यांची मालकी व कब्जा आहे. सदर क्षेत्रात वादी यांनी सदर क्षेत्रात सुमारे १० आंबा कलमाची स्वखचनि व अंगमेहनतीने लागवड केलेली होती व आहे.

**४.** सदर दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी त्यांचे एकत्र कमाईतून घेतलेली

होती व आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकत क्र. १ मधील एकूण क्षेत्रापैकी ०.०७.१८ एवढया क्षेत्राबाबत खरेदीखताचा दस्त क्र. १६६१/२०२३ नोंदविला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दावा मिळकत क्र. २ मधील संपूर्ण क्षेत्राबाबतचा खरेदीखताचा दस्त क्र. १३२७/२०२४ चा दस्त देवगड दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदविला आहे. मात्र त्यावेळी वादी हे त्यांच्या व्यवसायानिमित्त बाहेरगावी असल्याने व त्यांच्या अपरिहार्य कारणामुळे त्यावेळी वादी हे दावा मिळकतीचे खरेदीचे दस्त नोंदण्याकरीता देवगड दुय्यम निबंधक यांचेकडे समक्ष उपस्थित राहू शकत नव्हते. म्हणून त्यावेळी सदर दावा मिळकतीचे खरेदी ही प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावे केलेली होती व आहे. दावा मिळकती या प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे नावे खरेदी घेतली असली तरीही सदर दावा मिळकतीची खरेदीखताच्या मोबदला रक्कम ही वडिलोपार्जित शेतीतून कमवलेली होती व आहे. तसेच खरेदीखताचे वेळी वादी यांनी दावा मिळकतीचे खरेदीखताची मोबदला रक्कमेपैकी निम्मी रोख रक्कम प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना दिलेली होती व आहे. सदर मिळकतीची खरेदीची रक्कम ही वादी यांनी त्यांच्या कष्टातून कमवलेली होती व आहे. मात्र वादी हे त्यांच्या व्यवसायानिमित्त बाहेरगावी असल्याने तसेच त्यांच्या काही अपरिहार्य कारणामुळे सदर दावा मिळकती खरेदी करतेवेळी रजिस्टर कार्यालयात जाणे अडचणीचे झाले असल्याने सदर दाव्याचा विषय असलेली मिळकतीचे क्षेत्र प्र.वादी क्र. १ ते ४ यांचे नावे खरेदीने घेतलेली असल्याने वादी हे सहमालक व सहहिस्सेदार होते व आहेत. त्यानंतर वादी यांनी दाव्याचा विषय असलेल्या क्षेत्राचे वादी हे सहहिस्सेदार असल्याबाबत ठराव करून देण्याबाबत माहे १६ जानेवारी २०२६ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेकडे आपसांत समजुतीने व कायदेशीररित्या करणेकरीता सुचविले असता त्यास त्यांनी स्पष्टपणे नकार दिला. सबब दाव्याचा विषय असलेल्या क्षेत्राचे वादी हे सहहिस्सेदार असल्याचा ठराव होण्याकरीता सदरचा दावा वादीस दाखल करणेस भाग झाले. त्यावेळी व त्यानंतर वेळोवेळी या मे. कोर्टाचे स्थलसिमेत झाले व घडले असून या मे. कोर्टास या दाव्याचा ईन्साफ करणेचा अधिकार आहे.

**<u>५. दाव्यास कारण</u>** - वादी यांनी दाव्याचा विषय असलेल्या क्षेत्राचे वादी हे सहहिस्सेदार असल्याबाबत ठराव करून देण्याबाबत माहे १६ जानेवारी २०२६ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेकडे आपसांत समजुतीने व कायदेशीररित्या करणेकरीता सुचविले असता त्यास त्यांनी

स्पष्टपणे नकार दिला. त्यावेळी व त्यानंतर वेळोवेळी या मे. कोर्टाचे स्थलसिमेत झाले व घडले असून या मे. कोर्टास या दाव्याचा ईन्साफ करणेचा अधिकार आहे.

**६. दाव्याची आकारणी** - सदर दावा हा ठरावाकरीता असल्याने दाव्याची आकारणी ही १०००/- एवढी करून दाव्यास रक्कम रू. २००/- चा कोर्ट फि स्टॅप दाव्यास लावलेला आहे. वकील फी, प्रोसेस व कोर्टाचा अधिकार यांची आकारणी त्याप्रमाणात केली आहे.

**७. सबब वादीची विनंती अशी की,**

**अ.** प्रस्तुत वादी याचा दावा खर्चासह मंजूर करणेत यावा.

**ब.** दाव्याचा विषय असलेल्या क्षेत्राचे वादी हे सहहिस्सेदार असल्याचा ठराव करण्यात यावे

**क.** त्या अनुषंगाने झालेल्या हुकूमनामाची नोंद ही दावा मिळकतीच्या अधिकार अभिलेखात करण्यात यावी असा आदेश तलाठी सोमलेवाडी यांना देण्यात यावा.

**क.** या दाव्याचा खर्च तक्रारी प्रतिवादींकडून देववावा.

**ड.** जरूर तेव्हा दावा दुरूस्तीस सवड असावी

**ई.** वादीचे एकंदर हकीगतीस अनुसरून इतर योग्य व न्याय्य ती सर्व दाद देववावी.

येणेप्रमाणे दावा आहे.

आज दिनांक १४ माहे मार्च सन २०२६ रोजी पॅनल प्रमुख तथा दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), देवगड, तालुका देवगड, जि. सिंधुदुर्ग यांचे समोर, वादी हजर तर्फे वकील श्रीम.एम.एम. खोबरेकर हजर, सबब त्यांचे समक्ष व प्रतिवादी क्र. १ ते ४ हजर, तर्फे वकील श्रीम.एस.एस. कालेकर हजर, सबब त्यांचे समक्ष, नि. ९ चे अवार्डला अनुसरुन असा हुकुम होत आहे की

**ORDER**

1. The suit is disposed of as amicably settled before the National Lok Adalat in view of Award at Exh.9.
2. Compromise decree be drawn up accordingly.
3. Parties to bear their own costs.
4. Court fees, if any, be refunded as per rules.

मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवगड यांचे न्यायालयात

नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक २३/२०२६ निकाल तारीख –१४/०३/२०२६

निशाणी क्रमांक १० लगत

**खर्चाचा आकडा**

| अ.क्र. | वादीला झालेला खर्च | रुपये | पैसे | अ.क्र | प्रतिवादी क्र.१ ते ४ ला झालेला खर्च | रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फिर्याद अर्जास स्टॅम्प – नि.१ | २०० | ०० | १ | वजावटीला किंवा विरुद्ध दाव्यास स्टॅम्प | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प –नि.२ रु.१०/– प्रमाणे | १० | ०० | २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -नि.६ रु.१०/– प्रमाणे | १० | ०० |
| ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प – नि.-- प्रत्येकी रु. ५/- प्रमाणे | ०० | ०० | ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प – नि.--- प्रत्येकी रु. ५/- प्रमाणे | ०० | ०० |
| ४ | विशेष बेलिफ भत्ता– | ०० | ०० | ४ | भत्ता – | ०० | ०० |
| ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी - दावा रक्कम रु.१,०००/- | ४५ | ०० | ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी प्रतिदाव्यावरील प्लीडरची फी | ४५ | ०० |
| ६ | प्रोसेस लागू करणे | ०० | ०० | ६ | प्रोसेस लागू करणे | ०० | ०० |
| ७ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज – नि.---- प्रत्येकी रु. १०/– प्रमाणे | ०० | ०० | ७ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज –नि.---- प्रत्येकी रु. १०/– प्रमाणे | ०० | ०० |
| ८ | इतर अर्ज – नि.५ प्रत्येकी रु. ५ /- प्रमाणे | ०५ | ०० | ८ | इतर अर्ज – नि.---- प्रत्येकी रु. ५ /- प्रमाणे | ०० | ०० |
| | **एकूण** | **२६०** | **००** | | **एकूण** | **५५** | **००** |
| | **न दिलेला खर्च** | | | | **न दिलेला खर्च** | | |
| १ | न्यायालयीन शुल्क परतावा | २०० | ०० | १ | न्यायालयीन शुल्क परतावा | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प नि.----- | ०० | ०० | २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प –नि.---- रु.१०/– प्रमाणे | ०० | ०० |
| ३ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज – नि.---- प्रत्येकी रु. १०/– प्रमाणे | ०० | ०० | ३ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज –नि.९ प्रत्येकी रु. १०/– प्रमाणे | १० | ०० |
| ४ | इतर अर्ज – नि.---- प्रत्येकी रु. ५ /– प्रमाणे | ०० | ०० | ४ | इतर अर्ज – नि.---- प्रत्येकी रु. ५ /– प्रमाणे | ०० | ०० |
| | **एकुण** | **२००** | **००** | | **एकुण** | **००** | **००** |
| | **बाकी** | **६०** | **००** | | **बाकी** | **५५** | **००** |
| | **पूर्णांकात** | **६०** | **००** | | **पूर्णांकात** | **५५** | **००** |

**आज तारीख १४ माहे मार्च सन २०२६ रोजी आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

तयार करणार
(ए.एस.कुळकर्णी)
क.लिपीक

तपासले बरोबर आहे
(आर.ई.मणचेकर)
व.लिपीक

**(श्रीकांत.एस.पचंडी)**
**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),**
**देवगड**

CIVIL JUDGE J. D, Deogad
दिवाणी न्यायाधीश, देवगड

वादीतर्फे वकील – श्रीम.एम.एम.खोबरेकर सही करणेस गैरहजर

प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे वकील – श्रीम.एस.एस.कालेकर सही करणेस गैरहजर

(ह्या मुकदम्यातील पक्षकाराना अशी ताकीद देणेत येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपिलाचा निकाल झाल्यावर रेकॉर्ड नाश करणेच्या प्रचलित नियमास अनुसरुन नाश करुन टाकण्यास पात्र होतील.)